### माध्यमिक शिक्षक संघ बैठकीचे इतिवृत्त दि.१७/११/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | सेवापुस्तके तयार नसलेल्या शाळांवर (संस्थेवर) कोणत्या स्वरुपाची कारवाई अपेक्षित आहे? समयबध्द स्वतंत्र मोहिम राबविण्यात कोणती अडचण आहे.? | अधिक्षक, वेतन पथक यांनी डिसेंबर पेड जानेवारी च्या वेतनदेयकाबरोबर शाळेतील सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी, सेवापुस्तकाची दुय्यम प्रत पूर्ण झाल्याच्या कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षरींच्या प्रमाणपत्राची मागणी शाळा मुख्याध्यापकांकडून करावी. त्याशिवाय वेतन देयके स्विकारु नयेत. | शाळास्तरावर/ वेतनपथक स्तरावर | -- |
| २. | मा. शिक्षण उपसंचालकसो, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी २३ नोव्हेंबर २००२ रोजी आदेशित केलेल्या आदर्श पारदर्शक कार्यालयीन कार्यपध्दतीचा अंमल होत नसलेबाबत. | विभागातील सर्व दुय्यम कार्यालयांनी 'नागरिकांची सनद' मध्ये ठरवून दिलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे. | सर्व दुय्यम कार्यालये | -- |
| ३. | कार्यालयाकडून नस्ती गहाळ होत असल्याबाबत. | कार्यासनाकडून त्रुटी पुर्ततेसाठी प्रकरणिका संबंधीत शिक्षकांना दिली जाते. त्यामुळे नस्ती गहाळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधीत कार्यासनाकडून प्रकरणीका त्रुटीपूर्ततेसाठी संबंधीत शिक्षकांना न देता ती त्रुटीपूर्तता शाळेच्या संबंधीत शाळा मुख्याध्यापक/ लिपिकांकडून करुन घ्यावी.<br>तसेच मुख्याध्यापक यांनी त्यांचे शाळेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रलंबित असणाऱ्या प्रकरणांबाबत संबंधीत कर्मचाऱ्यांना कार्यालयाकडे न पाठविता संबंधीत शाळेच्या लिपिकांना सदरहू कामासाठी पाठवावे. अशा प्रकारच्या सूचना सर्व शिक्षणाधिकारी यांनी संस्था/शाळा मुख्याध्यापक यांना निर्गमित कराव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | सेवेत असतांना दिवंगत/अकाली सेवानिवृत्त झालेल्या खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित) शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक एसएसएन-२६९५(३९६/९५) माशि-२ मंत्रालय दिनांक ३१/१२/२००२ च्या आदेशाचा अंमल हेत नसलेबाबत सूरज उत्तम कांबळे आर.के.एस.,आर.के.नगर, कोल्हापूर) | सूरज उत्तम कांबळे आर.के.एस.,आर.के.नगर, कोल्हापूर प्रकरणाबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.कोल्हापूर यांनी तात्काळ कायर्वाही करावी.<br><br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबत शिक्षणाधिकारी यांनी सर्वप्रथम जिल्हास्तरावर यादी तयार करावी व अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबत प्राप्त प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करावी.<br>अनुकंपातत्त्वावरील शिक्षक भरतीबाबत शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णय दि. ३१.१२.२००२ व २०.०१.२०१६ नुसार कार्यवही करावी. | शिक्षणाधीकारी (माध्यमिक) जि.प.कोल्हापूर<br><br>शिक्षणधिकारी स्तरावर | -- |
| ५. | ज्या संस्था/शाळा शासनाचे कोणतेच आदेश मानीत नाहीत त्याबाबतीत काय करता येईल. संबंधीत शिक्षक कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडीतून कशी सुटका करता येईल या संदर्भा शासन निर्णय दि. १४/०२/१९७४, ०६/०३/२०१० व ०१/०३/२०११ च्या आदेशानुसार कार्यवाही होण्यात कोणत्या अडचणी आहेत. निर्णय कार्यवाही संदर्भात कार्यालयाचे अधिकार व अंमलबजावणी बाबतची भूमिका स्पष्ट व्हावी. | मनमानी कारभार करणा-या शाळांवर प्रशासक नियुक्तीबाबत कार्यवाही करणेची शिफारस या कार्यालयाला करता येईल. | | |
| ६ | आर.टी.ई. कायदा राज्यातल्या सी.बी.एस.ई अथवा आय.सी.एस. अभ्यासक्रम राबविणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांना लागू आहे किंवा कसे? सदर शाळावर महाराष्ट्र शासनाचे नियंत्रणआहे किंवा कसे? सदर शाळांची खात्यामार्फत वार्षिक तपासणी होते किंवा कसे ? | आर.टी.ई. कायदा राज्यातल्या सी.बी.एस.ई अथवा आय.सी.एस. अभ्यासक्रम राबविणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांना लागू आहे. सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांना शासनाकडून नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येते. | -- | -- |
| ७ | केंद्र शासन पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजनेंतर्गत काम करणाऱ्या शिक्षकांचे नियमित वेतन मिळकत नसलेबाबत शासकीय धोरण स्पष्ट व्हावे. | संचालनालय स्तरावर वेतन अनुदानाबाबत कार्यवाही सरु आहे. संचालनालय स्तरावरुन वेतनासाठी अनुदान उपलब्ध होईल. | -- | -- |
| ८ | दि.०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या व होणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी | दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सर्वसाधारण भविष्य निर्वाह | शासनस्तरावर/ शिक्षणाधिकारी/ वेतन | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | भविष्य निर्वाह निधिचे वर्गणीदार करुन घेणेबाबतचे धोरण स्पष्ट व्हावे. | निधिबाबतचे प्रकरण सद्या न्यायप्रविष्ठ आहेत.<br>ज्या कर्मचाऱ्यांची डि.सी.पी.एस. खाती उघडलेली आहेत अशा कर्मचाऱ्यांना डि.सी.पी.एस. कपातीच्या स्लिपा उपलब्ध करुन द्याव्यात. सर्व शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना याबाबत सूचना निर्गमित कराव्यात. | पथक स्तरावर | |
| ९ | खाजगी शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते सेवानिवृत्ती नंतरचे व इतर लाभ अधिनियम १९७७ नियम ४(१) नुसार विहित करण्यात येतात. एखाद्या कर्मचाऱ्याकडून असे वेतन व लाभ मागणार नाही असे प्रतिज्ञापत्र लिहून घेता येईल किंवा कसे? याबाबत मार्गदर्शन व्हावे. | संस्थेच्या अंतर्गत कामकाजात शिक्षण उपसंचालक कार्यालय अथवा शिक्षणाधिकारी हस्तक्षेप करु शकत नाही. | -- | -- |
| १० | १२ वर्षाची अर्हता नागरी सेवा झाल्या नंतर वरिष्ठ/निवड श्रेणीबाबत होण्यासाठी कोणकोणत्या संस्थामार्फत देण्यात येणारे प्रशिक्षण ग्राह्य धरता येते.असे प्रशिक्षण वर्ग केव्हा आयोजित केले जातात. राष्ट्रीय पातळीवर अथवा राज्य स्तरावरील कोण कोणत्या संस्था असे प्रशिक्षण वर्ग आयोजित करतात त्यांची यादी मिळावी. | याबाबत संघटनेने मा. संचालक एस.सी.ई.आर.टी., पुणे यांचेकडून माहिती घ्यावी. | संघटनास्तरावर | -- |
| ११ | मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई पुरस्कृत राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियाना अंतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणेत येते किंवा कसे? याची माहिती मिळावी (श्री. एम.जे.घोरपडे यांची तक्रार दि.३०.०८.२०१८) | असे प्रशिक्षण ग्राहय धरता येणार नाही. | शि.उ.स्तरावर | -- |
| १२ | शिक्षण संस्थामधील अंतर्गत वादाचे प्रकरण (बदली अर्ज) मे धार्मादाय आयुक्त यांचेकडे निवाडयासाठी प्रलंबित असतांना व सदर संस्थेत कोण अधिकृत पदाधिकारी आहेत याबाबत भाष्य करता येत नाही असा मे धार्मादाय उप आयुक्त यांचा अभिप्राय असताना कोणाचा पत्रव्यवहार अधिकृत मानता येईल किंवा कसे? | संस्थेच्या अंतर्गत कामकाजात शिक्षण उपसंचालक कार्यालय अथवा शिक्षणाधिकारी माध्यमिक हस्तक्षेप करु शकत नाही. | -- | -- |
| १३ | प्रत्यावर्तनाने मूळ शाळेत समायोजन केले जात असतांना शाळेतून पूर्वी अतिरिक्त ठरुन बाहेर गेलेल्या सेवामध्ये | समायोजनाबाबत सर्व शिक्षणाधिकारी यांनी एम.ई.पी.एस. १९८१ नियम २६ नुसार कार्यवाही करावी. शिक्षणाधिकारी यांनी | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | शिक्षकाला डावलून सेवा कनिष्ठ शिक्षकाला अग्रक्रम देता येतो का? (श्री. पांडूरंग तुकाराम भोसले मुदरगूळ विद्यालय, मुरगुड यांचा दि.२१/१०/२०१७ चा अर्ज) | सेवाज्येष्ठतेनुसार मुळ शाळेत प्रत्यावर्तनाला मान्यता द्यावी. | | |
| १४ | संस्थेत वाद असल्यास व बदल अर्ज मे. धर्मादाय उपायुक्त यांचेकडे प्रलंबित असल्यास सदर संस्थेतील शाळांतर्गत पदोन्नती नवीन भरती बदलीबाबत शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना अधिकार आहेत किंवा कसे? | संस्थेत वाद असल्यास व बदल अर्ज मे. धर्मादाय उपायुक्त यांचेकडे प्रलंबित असल्यास सदर संस्थेतील शाळांतर्गत पदोन्नती देता येणार नाही.<br>नवीन शिक्षक भरती आता शासन निर्णय दि.२३/०६/२०१७ नुसार पवित्र प्रणाली मार्फत ऑनलाईन करण्यात येणार आहे. | -- | -- |
| १५ | वरिष्ठ श्रेणी, निवड श्रेणी, पदोन्नती, बदली इ. कारणाने देय असणारी किती रक्कमेचे देयके थकीत आहेत ती केव्हा मंजूर होणार? | माहे मार्च-२०१८ पर्यंतची सर्व थकित देयके दि. २७-११-२०१८ पर्यंत कार्यालयास सादर करावेत. संचालनालयाकडून पाठपूरावा करुन माहे जारेवरी-२०१९ अखेर पर्यंत सर्व थकित देयकांची निर्गती करण्या बाबत संचालनालयास कळविणेत येईल. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| **आयत्या वेळचे विषय** | | | | |
| १ | जिल्हा स्तरवरील संघटना बैठका आयोजित करणे. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी दि. ३०/११/२०१८ पूर्वी सर्व संघटनांच्या बैठका घ्याव्यात. संघटनेकडून उपस्थित होणाऱ्या प्रश्न आपल्या स्तरवरुन सोडविण्याबाबत प्रयत्न करावेत. तसेच संघटनांच्या सहविचार सभांचे दर तीन महिन्यात नियमित आयोजत करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

शिक्षण उपसंचालक,
कोल्हपूर विभाग, कोल्हापूर